**FORM G**

**INVITATION FOR EXPRESSION OF INTEREST FOR SAPPHIRE HOSPITALS PRIVATE LIMITED OPERATING HEALTH AND SOCIAL WORK AT THANE, DIST. MUMBAI, MAHARASHTRA**

(Under Regulation 36A(1) of the Insolvency and Bankruptcy Board of India (Insolvency Resolution Process for Corporate Persons) Regulations, 2016)

| RELEVANT PARTICULARS | | |
|---|---|---|
| 1. | Name of the corporate debtor along with PAN/ CIN/ LLP No. | Sapphire Hospitals Private Limited<br>CIN: U85110MH2007PTC176497 |
| 2. | Address of the registered office | 3rd Floor, M.D. Office, Kaveri Heights, Opp. Mathre Talav, Kharegaon, Kalwa (W) Thane – 400 605 |
| 3. | URL of website | www.sapphirehospitals.com |
| 4. | Details of place where majority of fixed assets are located | 3rd Floor, M.D. Office, Kaveri Heights, Opp. Mathre Talav, Kharegaon, Kalwa (W) Thane, Dist. Mumbai |
| 5. | Installed capacity of main products/ services | 142 bedded hospital with 5 operation theatres |
| 6. | Quantity and value of main products/ services sold in last financial year | Revenue of Rs 14,63,80,206<br>In Financial Year 2021-22 |
| 7. | Number of employees/ workmen | 30 employees |
| 8. | Further details including last available financial statements (with schedules) of two years, lists of creditors, relevant dates for subsequent events of the process are available at: | Can be sought by sending request to Resolution Professional at: cirp.sapphirehospitals@gmail.com |
| 9. | Eligibility for resolution applicants under section 25(2)(h) of the Code is available at: | Can be downloaded from the company's website at: www.sapphirehospitals.com |
| 10. | Last date for receipt of expression of interest | 15/04/2023 |
| 11. | Date of issue of provisional list of prospective resolution applicants | 25/04/2023 |
| 12. | Last date for submission of objections to provisional list | 30/04/2023 |
| 13. | Process email id to submit EOI | cirp.sapphirehospitals@gmail.com |

Sd/-
Prasad Dharap
Resolution Professional of Sapphire Hospitals Private Limited
IBBI/IPA-001/IP-P00702/2017-2018/11228
AFA No.: AA1/11228/02/111223/105078
Plot No. 47, "Prasad",
New Ramdaspeth, Nagpur – 440 010
Email ID: cirp.sapphirehospitals@gmail.com
Date and Place: Nagpur 31/03/2023

CA PRASAD DHARAP
IP Reg.No. IBBI/IPA-001/IP-P00702/2017-2018/11228

संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

|| न मे भक्त प्रणश्यति ||

# सोने तस्करी आणि मुंबईची कुबेरनगरी

सुवर्ण खरेदी किंवा सोन्याच्या दागिन्यांचा वापर ही भारतीयांमध्ये असलेल्या अनेक छंदांपैकी एक महत्त्वाचा छंद असलेली बाब आहे. एकेकाळी आपली श्रीमंती आणि दागदागिन्यांची हौस भागवण्याकरिता सोन्याची खरेदी होत असे. त्या काळात सोन्याचा भावही आजच्या इतका आकाशाला भिडलेला नव्हता. अगदी चारशे पाचशे रुपये तोळा अशी किंमत असलेल्या काळात लोकांनी कधी सोने खरेदीची फारशी फिकीर केली नव्हती. कारण ती तितक्याच सहजपणाने होऊनही जात होती. मात्र आता देशाच्या लोकसंख्येत झालेली भरमसाठ वाढ आणि सोन्याकडे एक छंद म्हणून नव्हे तर गुंतवणूकीचा किंवा पैसे कमावण्याचा एक सशक्त पर्याय म्हणून पाहिले जाते. म्हणूनच गेल्या वीस-पंचवीस वर्षांत सोन्याच्या भावामध्ये प्रचंड वेगाने वाढ होत असल्याचे दिसून येते. अधिकृत मार्गाने सोन्याची विक्री होऊ शकत नाही किंवा लोकांच्या मागणीतील सातत्याने होणारी वाढ लक्षात घेऊन त्या प्रमाणात पूर्तताही होत नाही. मागणी आणि पुरवठा यातील तफावत मोठी असल्याने सोन्याच्या भावातही सातत्याने वाढ होते आहे. गेल्या आठवड्यात तर तब्बल साठ हजार तोळ्यापर्यंत सोन्याचा भाव गेला. स्वाभाविकपणे भारतात सोन्याला मिळणारा हा भाव आता आंतरराष्ट्रीय स्तरावर सोन्याचा व्यापार करणाऱ्यांसाठी मोठी संधी तर ठरतोच. परंतु अनधिकृतपणे किंवा चोरून तस्करीच्या मार्गाने जर हे सोने भारतात आले तर त्यातून पाचपट नफा होतो, अशी आज स्थिती आहे. गेल्या वर्षभरातल्या भारतातील एकूण सोने तस्करीच्या घटना पाहिल्या तर देशभरातल्या छोट्या मोठ्या अशा एकोणचाळीस विमानतळांवर सुरक्षा अधिकाऱ्यांनी तब्बल अडीच हजार किलो सोने जप्त केले. शिवाय इतर ठिकाणांवरून सुध्दा या चोरट्या सोन्याची विक्री होत असल्याचे लक्षात घेऊन तिथेसुध्दा १,४५९ किलो सोने जप्त झाले. विशेष म्हणजे सोने तस्करीत मुंबईच्या कुबेर नगरीचाही तितकाच श्रीमंत वाटा असल्याचे आढळून आले आहे. २०२१ आणि २२ या एका वर्षात एकट्या मुंबई विमानतळावरून तब्बल ६०४ किलो सोने पकडले गेले. म्हणजे काही अब्ज रुपयांचे चोरटे सोने पकडले गेलेले आहे. २०१९ पर्यंत या सोने तस्करीचे प्रमाण पाचशे किलोपर्यंत होते. मात्र नंतर ज्याप्रमाणात ते वाढले आहे ते जर लक्षात घेतले तर या सगळ्या वाढत्या तस्करीमागे आंतरराष्ट्रीय स्तरावर माफिया टोळी अधिक कार्यरत झाल्याचे स्पष्ट होते.

**भारतीयांमधील सोन्याचे वाढते आकर्षण**

भारत ही लोकसंख्येच्यादृष्टीने सर्व प्रकारच्या व्यापाराकरिता एक बाजारपेठच मानली जाते. मुळातच जगातल्या इतर देशांपेक्षा भारतातील लोकांना सोन्याचे सर्वाधिक आकर्षण आहे. आपल्या संपत्तीच्या समृद्धीचे शुभलक्षण मानण्याचीही भारतीयांमध्ये परंपरा आहे. म्हणूनच वर्षभरातल्या महत्त्वाच्या सणांना केली जाणारी सुवर्णखरेदी ही शुभ मानली जाते. दसरा, दिवाळी, यासारख्या सणांशिवाय साडेतीन मुहूर्ताला केली जाणारी सुवर्णखरेदी अधिक महत्वपूर्ण ठरते. त्यामध्ये पाडवा, अक्षय्यतृतिया, दसरा आणि दिवाळीचा समावेश होतो. परंतु केवळ या साडेतीन मुहूर्तावरच्या सुवर्णखरेदीने भारतीयांचे समाधान होणे शक्यच नाही किंवा आपल्या समृद्धीचा विस्तार करण्याकरीताच कदाचित दर महिन्यातला गुरूपुष्यामृत योग सोन्याच्या खरेदीसाठी खास राखून ठेवलेला पाहायला मिळतो. अर्थातच लग्नसमारंभांमधून होणारी दागिन्यांची खरेदी आणि त्यासाठी सतत कार्यरत राहणारी सोने-चांदीची बाजारपेठ हा व्यापारदेखील भारतामध्ये तितकाच समृद्ध व्यवसाय मानला गेला आहे. सुवर्णकारांच्या संघटनेकडून दिल्या जाणाऱ्या आकडेवारीप्रमाणे साधारणपणे वर्षाला भारतात किमान सहाशे टन सोने विकले जाते. हा अधिकृत आकडा जर खरा मानला तर याशिवाय अनधिकृतपणे होणारी सोने खरेदी तितकीच मोठी ठरू शकते आणि त्याचीच पूर्तता करण्याकरिता तस्करीचा मार्ग अवलंबला जात असावा. आतापर्यंतचे सगळे विक्रम मोडीत काढीत सोने तस्करीने जवळपास साडेचार हजार किलो चोरटे सोने भारतात दाखल झाल्याचे सांगितले जाते. मुंबई विमानतळावरची सहाशेचार किलो सोने जप्त करण्याची विक्रमी नोंद म्हणजे तस्करीसाठी हे विमानतळ अधिक सुखरुप मानले गेल्याचेच लक्षण आहे, असे म्हणावे लागेल. देशातील अन्य विमानतळांपेक्षा मुंबईत जगभरातून येणाऱ्या विमानांचीआणि पर्यायाने प्रवाशांचीही संख्या अधिक आहे. किमान एक-दीड कोटी प्रवासी जगाच्या कानाकोपऱ्यातून भारतात येतात आणि परतही जातात. परंतु त्यांचा हा प्रवास आता सोने तस्करीसाठी एक राजमार्ग बनू पाहतो आहे की, काय असे वाटू लागते. कारण वेगवेगळ्या युक्त्याप्रयुक्त्या करून आणले जाणारे हे सोने म्हणजे तपास अधिकाऱ्यांची कसोटी किंवा परीक्षा पाहणारे ठरले आहे.

**तस्करीचे नवे फंडे**

ज्याअर्थी इतक्या मोठ्या प्रमाणावर अन्य विमानतळांसह मुंबईतून एवढे मोठे चोरटे सोने जप्त केले गेले. म्हणजेच तस्करीचे प्रमाण वाढल्याचे तर सिद्ध होतेच, पण त्यांना पकडण्याची मोहीमही तितकीच तीव्र झाल्याचे ते संकेत ठरतात. धक्कादायक गोष्ट म्हणजे या तस्करीत इतर साधारण प्रवाशांशिवाय विमान कंपन्यांच्या कर्मचाऱ्यांचा सहभाग वाढल्याचेही समोर आलेले आहे. गेल्या तीन वर्षांत अशा प्रकारे तस्करी करणाऱ्या जवळपास ५८ विमान कर्मचाऱ्यांना अटक केली गेली. त्यात मुंबईतल्या विमान कंपन्यांच्या कर्मचाऱ्यांची संख्या अधिक असल्याचे सांगितले जाते. तस्करीच्या या वाढत्या प्रकारामध्ये नवेनवे फंडेही वापरले जातात. ज्यामध्ये चक्क सोन्याची पेस्ट करून तिची तस्करी करण्याचे प्रकार समोर आले. ही पेस्ट प्रवाशांच्या बॅगांच्या आतील भागाला लावलेली असते. एवढेच नव्हे तर सोन्याचे पातळ पत्रे, सोन्याची बिस्कीटं शिवाय अगदी बारीक बारीक गोळे करून ते प्रवाशांच्या शरीरात लपवून आणण्याचा प्रकार तपास अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आलेला आहे. या सगळ्या गोष्टींचा सातत्याने पाठपुरावा करून विमान प्रवाशांची झडती घेतली गेली आणि हे वाढते तस्करीचे प्रमाण केवळ सोन्यापुरते मर्यादित राहू शकत नाही तर त्यातून देशविरोधी कारवाया करणाऱ्यासुद्धा आपले उद्दिष्ट साध्य करण्यासाठी उपयोग होऊ शकतो. या पार्श्वभूमीवर वाढत जाणारी ही सोन्याची तस्करी देशविघातक कामासाठीसुध्दा धोकादायक ठरू शकते. प्रामुख्याने मुंबई विमानतळावर वाढणाऱ्या या तस्करीला अधिक भक्कमपणे नियंत्रणात आणण्याची गरज आहे.

## सुविचार

**विलास कोळेकर**
खंडाळा, रत्नागिरी.
मोबा.९४२२४२०६११

परिस्थितीशी झगडून पुढे आलेली माणसं नेहमी जपली पाहिजेत. कारण जीवनाचे खरं तत्वज्ञान ही माणसं फक्त शिकलेली नसतात तर जगलेलीही असतात.

## पंचांग

**शुक्रवार, ३१ मार्च २०२३**
**शक १९४५ शोभननामसंवत्सर**

**चैत्र शुक्ल दशमी * नक्षत्र : पुष्य**

**रवी उदय- ०६-३५**
**रवी अस्त- १८-५१**



**-: जन्मराशी :-**
**००-०१ ते २४-०० कर्क**

**सूर्य रेवतीला उ. रात्री १.३५ शालिवाहन जयंती**

मुद्रक, प्रकाशक **सौ. जयश्री रमाकांत खाडिलकर-पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफिस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ताः प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८ येथे छापून घेतले व नवाकाळ बिल्डिंग, १३ नवाकाळ पथ, खाडीलकर रोड, गिरगांव, मुंबई -४००००४ येथे प्रसिद्ध केले.
संपादक : **रोहित रमाकांत पांडे**

संपर्क : संपादक विभागः ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिरातीः ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेल navakal.1923@gmail.com
'नवाकाळ ऑफिस व नवाकाळ प्रेस'चे प्रकाशन दैनिक 'नवाकाळ' आर.एन.आय.क्र.१८१४/५७
REGD. No. MH/MR/SOUTH-143/2012-14
स्थापना ७ मार्च १९२३/ फाल्गुन वद्य ५ शके १८४४

Printed and Published by **Jayshree Ramakant Khadilkar-Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708. Published at Navakal Building, 13 Navakal Path, Khadilkar Road, Girgaum, Mumbai - 400 004.
Editor - **Rohit Ramakant Pande**

## पाककृती



# फणसाची भाजी



★ **साहित्य :-** कच्च्या फणसाचे गरे, फणसाच्या बिया ओलं खोबरं, सुकलेल्या लाल मिरच्या, लसणाच्या पाकळ्या, हळद, तेल, धणे, कोथिंबीर, मीठ चवीनुसार

★ कृती : सर्वात आधी कच्च्या फणसाचे गरे आणि बिया स्वच्छ करून त्याचे लहान काप करून घ्यावेत. गॅसवर एका भांड्यामध्ये गऱ्यांचे काप आणि हळद टाकून मंद आचेवर वाफवून घ्यावे. दुसऱ्या एका भांड्यात पाणी घेऊन त्यावर फणसाच्या बिया उकडून घ्याव्यात. दोन्ही गोष्टी शिजल्यानंतर एकत्र करून मिश्रण थंड करत ठेवावे. एक भांड घेऊन त्यामध्ये तेल गरम करत ठेवावे. तेल गरम झाल्यानंतर लसूण, धणे आणि लाल मिरच्यांचे तुकडे टाकून फोडणी तयार करावी. फोडणी तडतडल्यावर गॅस बंद करून फोडणी बारीक करावी. तुम्ही तुमच्या सोयीनुसार बारीक करू शकता. त्यासाठी तुम्ही खलबत्ता किंवा मिक्सरचाही वापर करू शकता. फोडणी थंड झाल्यावर गऱ्याच्या मिश्रणावर ओतावी आणि मंद आचेवर सर्व मिश्रण एकत्र करून एक वाफ घ्यावी. वरून चवीनुसार मीठ एकत्र करावे. गार्निशिंगसाठी ओलं खोबरं आणि कोथिंबीर टाकून भाजी सर्व्ह करावी.



# आजपासून आयपीएलचा थरार सुरू चेन्नईसमोर गुजरातचे पारडे जड



**उद्यापासून आयपीएलच्या १६ व्या हंगामाला अहमदाबादमध्ये सुरुवात होणार आहे. गतविजेत्या गुजरात टायटन विरुद्ध चेन्नई सुपर किंग यांच्यात सलामीची लढत होणार आहे. मात्र चेन्नई विरुद्ध गुजरातचे पारडे जड आहे. कारण गुजरातच्या संघात कर्णधार हार्दिक पंड्यासह अनेक टी-२० स्पेशालिस्ट आहेत. याउलट चेन्नईच्या संघात धोनी वगळता मोठा मॅच विनर खेळाडू नाही. चेन्नईने भलेही ४ वेळा आयपीएल जिंकलेली असली तरी मागील मोसमात चेन्नईची कामगिरी अत्यंत खराब झालेली होती आणि गुणतालिकेत हा संघ तळाला गेलेला होता.**



■ अहमदाबाद

**चेन्नईच्या** संघात बेन स्टोक सारखा मॅच विनर अष्टपैलू आहे, पण दुखापतीमुळे तो आजच्या सामन्यात खेळेल की, नाही हे सांगता येणार नाही. त्यामुळे चेन्नईची सर्व मदार कर्णधार धोनी अष्टपैलू रवींद्र जडेजा, मोईन अली तसेच सध्या जबरदस्त फार्मात असलेला डेवोन कॉन्वे अंबाती रायडू यांच्यावर असेल. याउलट गुजरात टायटनकडे कर्णधार हार्दिक पंड्या उत्कृष्ट अष्टपैलू आहे. डेव्हिड मिल्लर, केन विलियम्सन, शुभमं गिल, मॅथ्यू वेड, राहुल यांच्यासारखे मॅच विनर खेळाडू आहेत. त्यामुळेच मागील आयपीएल हंगामात गुजरात टायटनने आयपीएलचा 'खिताब' पटकावला होता.

यावेळीही त्याच जोशात गुजरातचा संघ आपले अभियान सुरू करेल, असे कर्णधार हार्दिक पंड्या याने सांगितले आहे. त्यामुळे उद्याच्या उद्घाटनाची सामन्यात चेन्नई विरुद्धच्या लढतीत गुजरात टायटन्सचे पारडे निश्चितपणे जड आहे. त्यामुळे गुजरात विजयी सलामी देण्याची शक्यता आहे

# चुरशीच्या कबड्डी सामन्यात नवनाथचा ज्ञानेश्वरवर विजय

■ मुंबई

**रामसेवक,** बालउत्कर्ष संघाने अभिनव स्पोर्ट्स क्लबने आयोजित केलेल्या तृतीय श्रेणी (स्थानिक) पुरुष गटाच्या उपांत्यपूर्व फेरीत धडक दिली. माटुंगा(पूर्व) येथील नप्पू लखमशी मनोरंजन मैदानावर

**अभिनव स्पोर्ट्स क्लब आयोजित कबड्डी स्पर्धा**

अत्यंत चुरशीने खेळला गेलेल्या या सामन्यात नवनाथ मंडळाने पूर्वार्धातील पिछाडीवरून ज्ञानेश्वर मंडळाला पूर्ण डावात बरोबरीत रोखले. त्यानंतर झालेल्या ५-५ चढायात ६-५(४१-४०) असे चकवीत बाजी मारली. अंकित घाडी, सिद्धेश गुरव यांच्या झंझावाती खेळाने नवनाथ मंडळाने ही किमया साधली. ज्ञानेश्वरच्या दिलीप जयकर, जितेश कट्टे यांनी अखेरच्या क्षणापर्यंत शर्थीची लढत दिली.

रामसेवकने श्री साईराजला नमविले. संकेत पोतदार, साहिल दळवी यांनी रामसेवककडून, तर प्रसाद चौधरी, तेजस चाळके यांनी साईराजकडून उत्कृष्ट खेळ केला. बाल उत्कर्षने चुरशीच्या लढतीत महेश मंडळाला पराभूत केले. श्रीकांत रेड्डी, मोहन सावंत यांच्या चढाई-पकडीच्या खेळाने हा विजय साकारला. विकी सिंह, जयेश खांबे यांचा खेळ महेश मंडळाचा पराभव टाळण्यास कमी पडला.

कुमार गटात एस.एस. जी.फाऊंडेशनने गोलफादेवीचा, अशोक मंडळाने हिंद केसरीचा, सूर्यकांत व्या. मंडळाने शिवप्रेरणाचा आणि अमर संदेशने शिवमुद्राचा पराभव करून आपली आगेकूच कायम राखली.

# श्रीकांत, सिंधू उपांत्यपूर्व फेरीत



■ मॅड्रिड

**स्पेन** मास्टर्स सुपर ३०० बॅडमिंटन स्पर्धेत भारताची स्टार बॅडमिंटन खेळाडू पीव्ही सिंधू आणि श्रीकांत कदंबी यांनी उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला आहे. श्रीकांतने दुसऱ्या फेरीत आपल्याच देशाच्या साई प्रणितला २१-१५, २१-१२ अशा सरळ सेटमध्ये पराभूत करून उपांत्यपूर्व फेरी गाठली. तर दुसरीकडे महिला एकेरीच्या सामन्यात पीव्ही सिंधू हिनेही आपल्या प्रतिस्पर्धीवर मात करून उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला आहे. दुखापतीमधून बाहेर पडल्यानंतर सिंधूची आता चांगली कामगिरी झाली आहे. मात्र या स्पर्धेत तिच्या समोर खडतर आव्हाने आहेत. दरम्यान गेल्या आठवड्यात स्वीस ओपनचा खिताब पटकावणाऱ्या सात्विक आणि चिराग जोडीला या स्पर्धेत मात्र पहिल्याच फेरीत अपयश आले तर महिला दुहेरीत गायत्री आणि जॉली ही भारतीय जोडीसुद्धा पराभूत झाली.

# आशिया कप फुटबॉल स्पर्धा भारत-जपान एकाच गटात

■ बँकॉक

१७ वर्षांखालील एएफसी आशिया कप फुटबॉल स्पर्धेचा ड्रॉ जाहीर झाला असून, भारत आणि जपान एकाच गटात आहेत. या गटात व्हिएतनाम आणि उज्बेकिस्तानचाही समावेश आहे.

१५ जून ते २ जुलै दरम्यान थायलंडमध्ये ही सार्ध खेळवली जाणार आहे. या स्पर्धेत प्रत्येक ग्रुपमधून दोन संघ नोकोटसाठी पात्र ठरतील. दरम्यान या स्पर्धेच्या माध्यमातून भारतीय फुटबॉल संघाला फुटबॉल विश्वातील मोठ्या संघांबरोबर खेळण्याची संधी मिळणार असून, या संधीचा आम्ही निश्चितपणे फायदा घेऊ असे भारतीय फुटबॉल संघाचे प्रशिक्षक बीबियानो फर्नांडिस यांनी सांगितले. भारतीय फुटबॉल खेळाडू आपल्या गटातील जपानविरुद्ध खेळण्यास उत्सुक आहेत.

# क्रांतीज्योती महिला कबड्डी स्पर्धा यजमान पुण्याचा कोल्हापूरवर विजय

**पुण्याच्या भूषण तपकीरने चढाईत ८ गुण मिळवले**

■ पुणे

'राजाराम भिकू पठारे स्टेडियम' खराडी, पुणे येथे अजपासून सुरू झालेल्या क्रांतीज्योत महिला प्रतिष्ठान युवा कबड्डी सिरीज - आंतर जिल्हा युवा लीगमध्ये यजमान पुणे पलानी टास्कर्स संघाने कोल्हापूर ताडोबा टायगर्स संघावर विजय मिळवत विजयी सलामी दिली. दोन्ही संघांनी सुरुवातीला सावध सुरुवात केली. त्यानंतर पुणे पलानी टास्कर्सच्या आर्यन राठोडने चढाईत २ गुण मिळवत पुणे संघाचे खाते उघडले.

पृथ्वीराज शिंदे व हर्षद माने यांच्या जबरदस्त पकडीमुळे कोल्हापूर ताडोबा टायगर्सवर सुरुवातीलाच लोन पडला. पलानी टास्कर्सकडे १५ मिनिटांपर्यंत १२-५ अशी आघाडी होती. त्यानंतर कोल्हापूर ताडोबा टायगर्सच्या तेजस पाटीलने सलग चढाया करत गुण मिळवत पुणे संघाची आघाडी कमी केली. मध्यंतरापर्यंत १६-१५ असा चुरशीचा खेळ झाला, पण नंतर पारडे फिरले. मध्यांतरानंतर कोल्हापूरच्या तेजस पाटील चढाईत तर ओमकार पाटीलने पकडीत गुण मिळवत पुणे संघाला पुन्हा ऑल आऊट केले. चुरशीच्या झालेल्या यासामन्यांत शेवटच्या चढाईत पुणेच्या भूषण तपकीरने चढाईत गुण मिळवत आपल्या संघाला ३०-२९ असा विजय मिळवून दिला. पुणेच्या भूषण तपकीर ने ४ बोनस गुणांच्या सह चढाईत ८ गुण मिळवले. कोल्हापूरकडून तेजस पाटीलने सर्वाधिक ८ गुणांची कमाई केली.

**जाहीर सूचना**

माझे अशील १) **कु. गायत्री राजामणी** आणि २) **कु. सौम्या राजामणी** यांच्या सूचनेअंतर्गत याद्वारे **सूचना** देण्यात येते की, त्या दि सेंट्रल ॲव्हेन्यू सीएचएस लि., प्लॉट क्र. ४०३ ए, सेंट्रल ॲव्हेन्यू रोड, चेंबूर, मुंबई ४०००७१ च्या "शंकर निकेतन" या इमारतीमधील ५ व्या मजल्यावरील सदनिका क्र. ५०२ तिचे मालक १) श्री. कृष्णन अय्यर आणि २) सौ. शालिनी बजाज सुर्वे (उर्फ पूर्वीचे नावः शालिनी कृष्णन अय्यर), ज्यांना सदर सदनिका विकासक आणि संस्थेकडून पुनर्विकासानंतर जुन्या शंकर निकेतन इमारतीच्या २ ऱ्या मजल्यावरील त्यांच्या विद्यमान जुनी सदनिका क्र. १८च्या बदल्यात मालकी हक्काच्या आधारे मिळालेली आहे, त्यांच्याकडून संयुक्तरित्या खरेदी करु इच्छितात. माझ्या अशिलांनी असे नमूद केले आहे की, सदर मालकांकडे सदर जुन्या सदनिकेच्या संदर्भातीलः- अ) पहिले मालक श्री. जे. एस. कार्वाल्हो यांचे मूळ वितरण दस्तऐवज आणि ब) श्री. जे. एस. कार्वाल्हो यांच्याकडून सौ. ओ. एक्स्ट्रोस यांना दुसरे मूळ करारपत्र/हस्तांतरण दस्तऐवज ताब्यात नाहीत आणि दोन्ही सदर दस्तऐवज हरवले/गहाळ झाले आहेत /सापडत नाहीत.

उपरोल्लेखित हरवलेल्या / गहाळ झालेल्या / सापडत नसलेल्या दस्तऐवजांवर किंवा सदर सदनिकेवर कोणतेही दावे असणाऱ्या सर्व व्यक्ती/अधिकाऱ्यांनी त्याबाबत मला कागदोपत्री पुराव्यांसह माझ्या निम्नउल्लेखित कार्यालयात सदर जाहीर सूचनेच्या प्रसिद्धी दिनांकापासून १५ दिवसांच्या आत लेखी सूचित करावे, अन्यथा असे मानले जाईल की, त्यावर कोणतेही दावे नाहीत आणि माझे अशील सदर सदनिका खरेदी करण्यास मुक्त असतील. जर सदर १५ दिवसांच्या कालावधीनंतर कोणतेही दावे प्राप्त झाल्यास ते सोडून दिले असे समजण्यात येईल.

**अभिषेक के. पारेख**
वकील उच्च न्यायालय
दुकान क्र. १५ आणि १६, जनता मार्केट,
चेंबूर रेल्वे स्थानकाजवळ, चेंबूर, मुंबई - ४०० ०७१.

**फॉर्म जी**
**ठाणे, जिल्हा मुंबई, महाराष्ट्र येथे आरोग्य आणि समाज कार्यामध्ये कार्यरत सॅफायर हॉस्पिटल्स प्रायव्हेट लिमिटेड करिता स्वारस्य अभिव्यक्तीचे आमंत्रण**
(भारतीय नादारी आणि दिवाळखोरी मंडळ (कॉर्पोरेट व्यक्तींकरिता दिवाळखोरी ठराव प्रक्रिया) विनियमन, २०१६ च्या विनियमन ३६ए (१) अन्वये)

**संबंधित तपशील**

| | | |
|---|---|---|
| १. | कॉर्पोरेट ऋणकोचे नाव व पॅन/सीआयएन/ एलएलपी क्र. | **सॅफायर हॉस्पिटल्स प्रायव्हेट लिमिटेड** **सीआयएनः** U85110MH2007PTC176497 |
| २. | नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता | ३ रा मजला, एम.डी. कार्यालय, कावेरी हाईट्स, म्हात्रे तलावसमोर, खारेगाव, कळवा (प), ठाणे-४००६०५. |
| ३. | वेबसाईटचे यूआरएल | www.sapphirehospitals.com |
| ४. | बहुसंख्य अचल संपत्ती असलेल्या जागेचा तपशील | ३ रा मजला, एम.डी. कार्यालय, कावेरी हाईट्स, म्हात्रे तलावसमोर, खारेगाव, कळवा(प), ठाणे, जि. मुंबई |
| ५. | मुख्य उत्पादने/सेवांची स्थापित क्षमता | ५ ऑपरेशन थिएटर्ससह १४२ खाटांचे रुग्णालय |
| ६. | गत वित्तीय वर्षामध्ये विक्री झालेल्या मुख्य उत्पादने/ सेवांचे परिमाण आणि मूल्य | वित्तीय वर्ष २०२१-२२ मध्ये रु. १४,६३,८०,२०६ चा महसूल |
| ७. | कर्मचारी/कामगारांची संख्या | ३० कर्मचारी |
| ८. | गत उपलब्ध दोन वर्षांची वित्तीय विवरणपत्रे (वेळापत्रकासह), धनकोंची यादी, त्यानंतरच्या प्रक्रियेच्या घटनांच्या संबंधित तारखा समाविष्ट असलेले पुढील तपशील उपलब्ध असण्याचे ठिकाणः | cirp.sapphirehospitals@gmail.com येथे ठराव व्यावसायिकांना विनंती पाठवून प्राप्त करता येईल. |
| ९. | संकेताच्या कलम २५(२)(एच) अन्वये ठराव अर्जदाराची पात्रता उपलब्ध असण्याचे ठिकाणः | कंपनी वेबसाईट www.sapphirehospitals.com येथून डाऊनलोड करता येईल. |
| १०. | स्वारस्य अभिव्यक्ती स्वीकारण्याकरिता अंतिम दिनांकः | १५.०४.२०२३ |
| ११. | संभाव्य ठराव अर्जदारांची तात्पुरती यादी पारित करण्याचा दिनांक | २५.०४.२०२३ |
| १२. | तात्पुरत्या यादीवर आक्षेप सादर करण्याचा अंतिम दिनांक | ३०.०४.२०२३ |
| १३. | ईओआयकडे सादर करण्यासाठी प्रक्रिया ईमेल आयडी | cirp.sapphirehospitals@gmail.com |

सही/-
**प्रसाद धारप**
सॅफायर हॉस्पिटल्स प्रायव्हेट लिमिटेडचे ठराव व्यावसायिक
IBBI/IPA-001/IP-P00702/2017-2018/11228
एएफए क्र.: **AA1/11228/02/111223/105078**
प्लॉट क्र. ४७, "प्रसाद", न्यू रामदासपेठ, नागपूर - ४४००१०.
ईमेल आयडी: **cirp.sapphirehospitals@gmail.com**
दिनांक आणि ठिकाणः नागपूर ३१.०३.२०२३

**जाहीर सूचना**

याद्वारे सूचना देण्यात येते की, माझे अशील मणी महाल प्रिमायसेस को-ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेड हे मुंबई शहर आणि मुंबई उप-नगरच्या उप-जिल्ह्यासह नोंदणीकृत ११/२१, मॅथ्यू रोड, मुंबई - ४०० ००४ येथे स्थित मणी महल इमारतीमधील तळ मजल्यावर प्रवेशद्वाराच्या उजव्या हातास उभी युनिट/शेड, मोजमाप ३०० चौ.फू. (कार्पेट) अदमासे आणि याखाली लिहिलेल्या अनुसूचीमध्ये अधिक तपशीलवारपणे वर्णन केलेल्या (यापश्चात सदर जागा असे उल्लेखित) जमीन किंवा मैदानाचे संपूर्ण मालक आणि कायदेशीर हक्क, शीर्षक आणि हितसंबंधांचे धारक आहेत.

सदर जमीन/संरचना किंवा तिच्या कोणत्याही भागाकरिता किंवा मध्ये विक्री, हस्तांतरण, नियुक्ती, अदलाबदल, प्रभार, बोजा, भाडेकरू, उप-भाडेकरू, भाडेपट्टी, उप-भाडेपट्टी, परवाना, गहाणवट, वारसा, भेट, धारणाधिकार, देखभाल, मृत्युपत्र, वहीवाट, न्यास, करार, ताबा किंवा अन्यथा कशाही स्वरुपाचा कोणताही हिस्सा, हक्क, शीर्षक, संपत्ती, हितसंबंध, दावा किंवा मागणी असल्याचा दावा करणारे किंवा असणारे सर्व व्यक्ती यांनी सदर सूचनेच्या दिनांकापासून १४ दिवसांच्या आत सदर दाव्याची सूचना त्यासंदर्भात संबंधित कागदोपत्री पुराव्यांसह लेखी स्वरुपात देणे आणि माझ्या कार्यालयात भेट देणे आवश्यक आहे, ज्या कालावधीनंतर, दावा केलेला असा कोणताही हक्क किंवा दावा आणि हितसंबंध, जर असल्यास, दुर्लक्षित करण्यात येईल आणि असे समजण्यात येईल की, शीर्षक बोज्यांपासून मुक्त आहे.

**जागेची अनुसूची**

मुंबई शहर आणि मुंबई उप-नगरच्या उप-जिल्ह्यासह नोंदणीकृत ११/२१, मॅथ्यू रोड, मुंबई - ४०० ००४ येथे स्थित मणी महल इमारतीमधील तळ मजल्यावरील प्रवेशद्वाराच्या उजव्या हातास उभी युनिट/शेड, मोजमाप ३०० चौ.फू. (कार्पेट) अदमासे (यापश्चात सदर जागा असे उल्लेखित) या जमीन किंवा मैदानाचे सर्व खंड किंवा तुकडे.

दिनांक ३१ मार्च, २०२३
**आरडीजे लॉ ॲडव्होकेट्स, मुंबई.**
**दिनेश कुमार जैन,**
**ॲडव्होकेट्स मुंबई उच्च न्यायालय**
१९०६, १९वा मजला, अमन गृह इमारत, १ला कार्पेन्टर स्ट्रीट, सी.पी. टँक रोड, मुंबई-४००००४.
ईमेलः djlaw123@rediffmail.com